**BDC LIBRARY**

**News Paper Clipping**

**A.Y. 2025-26**

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य प्रेरणादायी

## प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांचे प्रतिपादन, बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये महापुरुषांना अभिवादन

वार्ताहर

पाटण

साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य परिवर्तनाला दिशा व चालना देणारे आहे. समाजसुधारक अण्णाभाऊ साठे क्रांतिकारक विचारसरणीचे लेखक होते. आयुष्यभर सर्वसामान्यांना सहज समजेल अशा ग्रामीण भाषेतून शाहिरी करत वंचितांसाठी समाजप्रबोधन करणाऱ्या अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य प्रेरणादायी होते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एस. डी.पवार यांनी केले.

पाटण येथील बाळासाहेब देसाई कॉलेजमधील मराठी विभाग व शाहीर भाऊ फक्कड साहित्य कला प्रतिष्ठान, पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून इतिहास विभाग प्रमुख डॉ. आर. जी. कांबळे उपस्थित होते. मराठी विभागप्रमुख प्रो. डॉ. पी. जे. ऐवळे, प्रा. डॉ. सौ. एच. व्ही. काटे, प्रा. डॉ. विनायक राऊत, प्रा. कु. पी. डी. इंगवले यांची यावेळी उपस्थिती होती.



पाटण : लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ. एस. डी. पवार. समवेत मान्यवर.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. पवार म्हणाले, अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य मराठीसोबतच २४ भाषांमध्ये भाषांतरीत झाले आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अण्णाभाऊंचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी लोकमान्य टिळक जीवनकार्याची माहिती सांगितली.

डॉ. आर. जी. कांबळे म्हणाले, अन्यायाची जाणीव करून देणे आणि त्याविरोधात लढण्यासाठी उद्युक्त करणे हेच अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे उद्दिष्ट होते. अण्णाभाऊ यांचे साहित्य प्रबोधनवादी व परिवर्तनवादी होते. महाराष्ट्रात मुंबई असण्यामध्ये अण्णाभाऊ यांचे मोलाचे योगदान आहे.

प्रो. डॉ. पी. जे. ऐवळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. विनायक राऊत यांनी आभार मानले. यावेळी सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.